
# उस्मानाबाद जिल्हा



# * प्रकरण १ ले *

प्रकरण १ ले                                        दि.७.७.८८

## लोकसंख्या शिक्षणाचे महत्व.

## :- सद्यस्थीत व लोकसंख्या वाढीची समस्या :-

प्रास्ताविक :-

आपल्या भारत देशामध्ये सर्वत्र जे दृश्य दिसून येते त्याचे निरिक्षण संशोधक शास्त्रशुध्दपणे करणार आहे. देशांतील वाढती गरीबी दारिद्रय, बेकारी, वस्तुंची टंचाई व निकृष्ट दर्जाचे जीवमान इत्यादी आपणास सदैव भेडसावत सोडणाऱ्या समस्या आहेत. निकृष्ट जीवनमान जगत असतांना मानवी जीवनांची मूलभूत मुल्ये संपलेली आहेत. जीवनमुल्यांमुळे जीवनास एक सुसंस्कृतपणे प्राप्त होत असतो. विश्वाच्या रचनेमध्ये सत्य शिव आणि सौंदर्य यांचा शोध व बोध घेण्याचे सामर्थ्य मानवामध्ये आकार घेत असते. मानवी समाज हा सतत परिवर्तनशील असून आपणांस हवा असणारा आकार देता येतो. मात्र प्रयत्न अविश्य केले पाहिजेत.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देखील आपल्या देशामध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही नांदते काय? याचा सुज्ञानी विचार करण्याची सांप्रत वेळ आलेली आहे। समता, विश्वबंधुत्व, स्वातंत्र्य ही जिवन-मुल्ये फक्त राज्य घटनेच्या कागदावरच शिल्लक राहिलेली असल्याचा अनुभव आपणास प्रत्यक्ष जीवन जगतांना पदोपदी येत असतो. भारत देशामध्ये आजची द्रारिद्रय रेषेच्या खाली जीवन जगणाऱ्या लोकसंख्येचा विचार विकासाच्या दृष्टीने केलेला आढळत नाही. विद्यमान अर्थव्यवस्थेमुळे गरीब अधिक गरीब व श्रीमंत अधिक श्रीमंत बनत चाललेला आहे. वर्गहीन समाजरचनेचे पंडीत जवाहरलाल नेहरूंचे स्वप्न साकार होण्यासाठी देशांतील तरुणांना आपल्या प्रयत्नांचा वेग वाढवावा लागणार आहे. गरीबीचा उद्रेक असते, गरीब माणुस

......

वाईट नसतो. गरीबांची गरीबी हटविण्यासाठी योग्य दिशेने प्रयत्न केले गेले नाहीत तर हा भस्मासूर आपल्या लोकशाहीस भस्म करून टाकल्याशिवाय कदापिही रहाणार नाही. गरीबांना मुलभूत गरजा भागवितांना अत्यंत कष्टमय जीवन जगावे लागते. अन्न, वस्त्र, निवारा, औषधपाणी इ. जीवनावश्यक घटकही त्यांना गरजेप्रमाणे आपण देऊ शकत नाही. आजही देशामध्ये शेकडो लोक अर्धपोटी, अर्धनग्न वस्त्रामध्ये राहून औषधपाण्याविना आपले जीवन कंठत असतात. श्रमजीविलोक, आदीवासी भागातील लोक, ग्रामीण-भागातील लोक, अल्पभूधारक शेतक-यांचा वर्ग, शहरांतील बेकार वस्त्यांमधून भटकणा-या बेकार तरुणांचा वर्ग, अत्यंत निकृष्ट दर्जाचे जीवन जगत असतो. आर्थिक दृष्टीने कमकुवत असलेला हा वर्ग हळूहळू त्यांचे पूर्ववलन व त्यामुळे गुन्हेगारीकडे वळतो. समाजांतील प्राप्त समस्या त्यांच्या गुन्हेगारीमुळे आणखीन विस्तारक स्वरूप धारण करतात. विशेषत: शहरवस्तीमध्ये आर्थिक स्वरूपाचे गुन्हे, विविध प्रकारची व्यसने, लैंगिक गुन्हे, बालगुन्हे यांचे मुळ आपणांस त्यांच्या दारीद्र्यामध्ये आढळते. देशांतील सरकारी, निमसरकारी व खाजगी क्षेत्रातील विविध कार्यकारी संघटना गरीबांची गरीबी हटविण्यांची विविध कलमी योजना जाहीर करीत असतात. परंतु प्रत्यक्षात तळा गळांतील किती टक्के लोकांना या योजनांचा फायदा होतो हा एक अत्यंत विवाद्य प्रश्न आहे. मूलभूत संशोधनवृत्तीच्या संशोधकानी या सर्व अव्यवस्थेच्या मूळाशी देशाची वाढती लोकसंख्या हे एक प्रमुख कारण दर्शविलेले आहे.

लोकसंख्येचा विस्फोट हा जगामधील अनेक विकसनशील राष्ट्रांना भेडसावणारा यक्ष प्रश्न आहे. नव्याने स्वतंत्र झालेले देश विकासाकडे वाटचाल करत आहेत. परंतु लोकसंख्यावाढीमुळे त्यांना

या प्रयत्नांना फारसे यश प्राप्त झालेले नाही. लोकसंख्येच्या समस्येमध्ये केवळ संख्यात्मक बाब महत्वाची नसून लोकसंख्येची गुणवत्ता महत्वाची आहे. लोकसंख्या वाढ व जीवनमान यांचा अन्योन्य संबंध आहे. चांगले जीवनमान अंतीमतः लोकसंख्या वाढ नियंत्रित करू शकते. एका विशिष्ठ मर्यादेपर्यन्त नियंत्रित केलेली लोकसंख्या आर्थिक विकासाला पोषक ठरून परिणामतः लोकांचे जीवनमान सुधारण्यास साहाय्यभुत ठरते.

## वाढत्या लोकसंख्येचे स्वरूप व त्यातून निर्माण झालेले प्रश्न

देशामध्ये अनेक महान समस्या आहेत. त्यापैकी वाढती लोकसंख्या हा एक प्रश्न आहे. इ.स. १८७१ पासून आपल्या देशात भारतीय जनगणना पद्धत सुरू झाली. तेव्हापासून आजपर्यंतची आकडेवारी आपणास असे दर्शविते की, सन १९३१-४१ पासून भारतात लोकसंख्या प्रचंड प्रमाणांत वाढु लागली. स्वांतत्र्योतर काळात आपण एकसाथ पुष्कळ प्रयत्न केले. उत्पादकाच्या अनेक क्षेत्रात प्रगतीची पातळी गाठली. परंतु हा विकास लोकसंख्येच्या भस्मासूरांनी गीळंकृत करून टाकलेला आहे. आपण जेवढा विकास करावा त्याच्या अनंत पटीने खाणारी तोंडे सतत वाढत आहेत. त्यांच्या हातांना योग्य असे कामही देता न आल्याने वाढती बेकारी झाली आणि घसरत जाणारा जीवनमानाचा राक्षस यांच्या दुष्ट चक्रात आपला देश पूर्णपणे अडकलेला आहे. या भयावह रस्सीखेची दखल घेऊन परिणामकारक उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. जुलै १९८७ मध्ये जगाची लोकसंख्या ५ अब्ज एवढी झालेली आहे. पुढील दशकामध्ये १ अब्ज एवढी निश्चीत वाढेल. कारण जगाच्या लोकसंख्या वाढीचा दर १.९८ आहे. तर आपल्या भारत

देशाचा २.५ % इतका आहे. भारतात दर सेकंदाला २ मुले जन्म पावतात. या मानाने मृत्युचा दर अतिशय नगण्य असल्याने आपली लोकसंख्या बेसुमार वाढत चाललेली आहे.

भारतीय लोक प्रशासनाने पंचवार्षिक योजनांचे द्वारे लक्षावधी रुपये खर्च करुन लोकसंख्या नियंत्रण करण्याचा प्रयत्न केला परंतु लोकसंख्या वाढीचा दर कमी करण्यात हवे तेवढे यश प्राप्त झालेले नाही. लोकसंख्या जन्मामुळे वाढते व मृत्युमुळे कमी होते. लोकसंख्येतील परीवर्तनास प्रत्येक कुटुंब जबाबदार असते. वैधकीय प्रगतीमुळे मृत्युचा दर कमी होतो. भारतातील मृत्युचे प्रमाण प्रगत राष्ट्रापेक्षा जास्त कमी होते. भारतातील मृत्युचे प्रमाण प्रगत राष्ट्रापेक्षा जास्त आहे. वाढत्या जनन प्रमाणापेक्षा मृत्युचा दर कमी असल्याने लोसंख्या सतत वाढत रहाते. म्हणुन लोकसंख्येचे परिमाण व रचना यामध्ये बदल घडविण्यास कुटुंब संस्थानी सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे.

भारताने गेल्या चार दशकात किती प्रगती केली याचा विचार केला तर आजहि देशातील सर्व सामान्य जनतेचे प्रश्न अद्यापही सुटलेले नाहीत. ठराविक भागाचा विकास म्हणजे राष्ट्राचा विकास मानायचा का? विशिष्ट मुठभर लोकांचा विकास म्हणजे सर्वांचा विकास मानायचा का? महागाईचा भस्मासुर व भ्रष्टाचाराचा धुमाकुळ थांबला आहे का? गरिबी नष्ट झाली आहे का? विषमता कमी झाली आहे का ? अस्पृश्यता संपली आहे का? दरडोई उत्पन्नात आणि रहाणीमानात सुधारणा झाली आहे काय ? देशातील बेकारी कमी झाली आहे काय? स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचा समान दर्जा मिळाला आहे काय ? लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आले आहे काय ? देशाची लोकसंख्या ३६ कोटी वरुन ८० कोटींवर पोहचली भविष्यात

लवकरच आपण १०० कोटी होऊत। आजही देशात ३७ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली जीवन जगतात विषमता वास्तव आहे. बेकारी वास्तव आहे. अद्यापही अनेक सामाजिक प्रश्न आजही सुटलेले नाहीत. सामाजिक अंतर्गत अवस्थेचा धोका व बाहेरुन अणु युध्दाचा धोका दुहेरी संकटात आपली अर्थ व्यवस्था अडकलेली आहे. देशाच्या आठव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करतांना या सर्व प्रश्नांचा विचार करणे क्रमप्राप्तच ठरते. शैक्षणिक प्रगती व प्रयत्नाचा अपुरेपणा :-

देशात स्वातंत्र्योत्तर काळांत शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड प्रगती साधलेली आहे. परंतु त्यातुन लोकसंख्या शिक्षणाच्या माध्यमांतुन हवी असणारी जाणीव मात्र निर्माण झालेली नाही. स्त्रियांनी होणा-या अपत्यांच्या संख्येचा संबंध त्यांच्या शिक्षणाशी असल्याचा निष्कर्ष हैद्राबाद येथील राष्ट्रीय अन्न व संशोधन संस्थेने आपल्या पहाणी अहवालात दिलेला आहे. या संस्थेने मुलींच्या विवाहाच्या वयाबद्दलचा शास्त्र शुध्द अभिप्राय व्यक्त केलेला विशेषत: मुलींच्या ग्रामीण विभागांतील शिक्षणाच्या अपु-या प्रयत्नावर टीका केलेली आहे.

देशात ग्रामीण विभागात १ कि.मी. अंतराच्या आत शाळा आहेत. विद्यार्थी, शिक्षक शैक्षणिक संस्था व आर्थिक तरतुदी यांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. परंतु अवस्थेचे काय ? शिक्षणांतुन अनेक सामाजिक प्रश्न सुटण्याऐवजी त्यांचे स्वरुप अधिकच उग्र बनत चालले आहे.

१९५०-५१ पासुन १९८२-८३ पर्यन्त साक्षरतेचे प्रमाण १६.६७ % वरुन ३६.२३ % व प्रौढ साक्षरता १९.३ % वरुन ५०.७ % वर वाढलेले आहे. १९८५ पर्यन्त प्राथमिक शाळा १३५९६ वरुन १,३०,००० पर्यन्त गेलेला आहेत. प्राथमिक शाळा तर २०९६०१ वर ५, २०,००० पर्यन्त पोहोचलेला

आहे. ५,९,००० उच्च माध्यमिक शाळा वाढलेल्या आहेत. महाविद्यालयाची संख्या ७९८ वरून ५२४६ पर्यन्त वाढलेली आहे.

१९५०-५१ मध्ये असलेल्या २७ विद्यापीठांत वाढ होऊन ती १४० ~~[illegible]~~ झाली आहे. विद्यार्थी संख्या २.०८ कोटीवरून ११.४ कोटी, अध्यापक ७,५०,००० वरून ३२,००,००० आणि शिक्षणासाठी असलेल्या तरतुदीत १९५०-५१ मधील ११४.३ कोटी रुपयांपासून १९८२-८३ पर्यन्त ५१८५.९ कोटी रुपये एवढी प्रचंड वाढ झालेली आहे. भारतात जगातील एकूण शास्त्रज्ञांपैकी १/३ वैज्ञानिक आणि तंत्रज्ञ भारतात आहेत. आपल्या देशात पदार्थ विज्ञान, भूविज्ञान, वैद्यक, नैसर्गिक विज्ञान, अभियांत्रिकी व समाजशास्त्र इत्यादिंच्या प्रशिक्षण व संशोधन संस्थात संख्यात्मक व गुणात्मक प्रचंड वाढ झालेली आहे.

परंतु दुर्दैवाने शिक्षणपद्धतीमध्ये लोकसंख्या कशी कमी करावी या मुलभूत समस्येचे शास्त्रीय शिक्षण देणारी यंत्रणा अजूनही उपलब्ध नाही. शालेय अभ्यास क्रमातून अशा प्रकारची जाणीव निर्माण करण्याचे कार्य घडत नाही. असणारा हा अपूरेपणा आपणांस दूर करावयाचा आहे. त्यासाठी नव्याने प्रयत्न केले जाणे ही काळाची गरज आहे.

## लोक संख्या व जागृतीची कल्पना

आपल्या देशाचीच नव्हे तर पर्यायाने संपूर्ण जगाची लोकसंख्या अत्यंत झपाट्याने वाढत आहे. जुलै १९८७ मध्ये जगाची लोकसंख्या ५ अब्ज एवढी झालेली आहे. पुढील दशकामध्ये १ अब्ज एवढी लोकसंख्या निश्चीत वाढेल. या प्रचंड स्फोटाबद्दल जनमानसांत जागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. विशेषत: वय वर्षे १३ ते १९ मधील वयोगटाच्या मनोभूमिकेमध्ये या

या समस्येकडे पहाण्याचा दृष्टिकोन बदलून त्यांच्या मनांत सामाजिक जाणीव निर्माण केली पाहिजे. कारण ह्या वयोगटातील मनोभूमिकेचा परिणाम भविष्यकाळांत होणा-या लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवणारा आहे. आपणास नुसते संख्येवर नियंत्रण ठेवून भागणार नाही. तर "लोकसंख्या शिक्षण म्हणजे लोकांचे दैनंदिन जीवन सुखी, समाधानी आणि प्रगत करण्यासाठी घ्यावयाचे शिक्षण होय "असा अभिप्राय लोकसंख्या शिक्षणामुळे कुटुंब कल्याण व जनकल्याण साधता येतो.

लोकसंख्या शिक्षण म्हणजे नेमके काय ?

या विषयाचे ज्ञान अजूनही अनेकांना निश्चितपणे झालेले नाही. असाही एक गैरसमज आहे की," लोकसंख्या शिक्षण म्हणजे फक्त लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्याच्या योजनांचा अभ्यास हा या विषयाचा मुख्य गाभा आहे." परंतु ही संकल्पना चुकीची आहे.

[२] " लोकसंख्याशास्त्र म्हणजे फक्त वाढत्या लोकसंख्येचे नियंत्रण नव्हे तर, जनतेला योग्य प्रकारचे रहाणीमान, आरोग्य, पुरेसा आहार प्राप्त करून देणे तसेच समाजाला राष्ट्र विकासाच्या कार्यात सहाय्य-भूत ठरणारी मनोवृत्ती प्रदान करणे. हा या विषयाचा प्रधान हेतू आहे". शिक्षक तज्ञ व सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येऊन, विचार-मंथन करून, शासकीय निमशासकीय व खाजगी क्षेत्रात काय करता येईल? हे ठरवले पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमिक पातळीवर शालेय विषयातून लोकसंख्या शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरवण्यासाठी शिक्षण तज्ञांनी " हिरवा कंदील" दाखविलेला आहे.

माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना वाढत्या लोकसंख्येच्या दुःष्परिणाम समजाऊन देऊन त्यांची

[१] लो. मार्गदर्शक हस्त पुस्तिका :- पृष्ठांक ३.म.रा. शि.सं. प. परिषद १९८७

[२] दै. लोकमत:- पृष्ठांक १ दिनांक १३.१०.१९८७ लेखक प्रा. डी. आर. सोनवणे-

पोषक ठरणारी मनोवृत्ती घडविण्याचे कार्य प्रशिक्षित शिक्षक मंडळी उत्तम रीतीने करू शकतील. लोकसंख्या शिक्षणांत शास्त्र शुद्ध लैंगिक शिक्षणाची कुशलतेने जोड दिल्यास ते ही उपयुक्त कार्य ठरू शकेल. लैंगिक शिक्षणाचे ज्ञान भरतासारख्या देशांत पालक संकोचामुळे पाल्यांना देऊ शकत नाहीत. शाळा महाविद्यालयात देखील या विषयाबद्दल आनाठायी भय आढळते. त्यामुळे युवकांचे अपरिमित नुकसान होत आहे. विशेषत: पौगंडावस्थे- तील पिढीकडून होणाऱ्या दुष्परिणाम अत्यंत विदारक आहेत. म्हणूनच देशातील १३ ते १९ वय या वयोगटातील संस्कार क्षम पिढीला या विषयाचे ज्ञान होणे अत्यंत गरजेचे आहे. संस्काराच्या शिक्षणाचे आद्य उद्दिष्ट आहे. म्हणून लैंगिक शिक्षणास लोकसंख्या शिक्षणापासून विभक्त करून चालणार नाही.

(आधार काय?) भारतामध्ये आजपर्यन्त ८ कोटी स्त्रिया जननक्षम आहेत. हीच संख्या या शतकाचे अखेरीस १४ कोटी पर्यन्त जाणार आहे. म्हणून आपणास लोकसंख्या नियंत्रणाची गती विविध कार्य- क्रमांच्या माध्यमातून तीन पटीने वाढवावी लागणार आहे. भारताने इ. स. २००१ मध्ये जन्म दर २१% ने तर मृत्यु दर ९% ने कमी करण्याचे ध्येय निश्चीत केलेले आहे. (प्रमाण) या शतकाच्या अखेरीस १०० कोटी ऐवजी जर आपण लोकसंख्या ९० कोटीवर स्थिर ठेवण्यात यशस्वी झालो. तरी देखील आपण या विषयाच्या अभ्यासाची फल निष्पती गाजवी असे ठरणार आहे.